# श्रीगुरुमाईंचा आशीर्वाद

*शनिवार, २१ नोव्हेंबर, २०२०*

‘श्री’ ते आहे जे चमचमते.
याचा अर्थ असा की, निर्मळ पाणी ‘श्री’ आहे—
जिथे समस्त प्राणिमात्रांना जीवन मिळते.

‘श्री’ ते आहे जे मनोहारी आहे.
याचा अर्थ असा की, प्रत्येक हृदय ‘श्री’ आहे—
जिथे प्रेमाग्नी तेजस्वीपणे धगधगत असतो.

‘श्री’ ते आहे जे ऐश्वर्यसंपन्न आहे.
याचा अर्थ असा की, सद्‌गुणांनी युक्त मन ‘श्री’ आहे—
जिथे प्रशांतीचा वास असतो.

‘श्री’ जीवनाच्या चार पूजनीय उद्दिष्टांपैकी एक आहे.
याचा अर्थ असा की, जीवन ‘श्री’ आहे—
जिथे भगवत्प्रेम खरी संपदा आहे.

‘श्री’च्या मर्मस्थानी विशुद्ध औदार्य आहे.
जे काही ‘श्री’ आहे ते मनोरम असायलाच हवे,
ते व्यापक असायलाच हवे.

‘यशस्’ म्हणजे त्याला श्रेय देणे
जो विजयाचा खरा अधिकारी आहे.
याचा अर्थ असा की, ‘यशस्’ घेतले जात नाही.
तर, ते दिले जाते.

‘यशस्’ म्हणजे कठोर परिश्रमाचे फळ.
याचा अर्थ असा की, अनेक लोकांचा आधार अत्यावश्यक आहे,
आज आणि दररोज.

‘यशस्’ म्हणजे ती किर्ती जी इतरांचे उत्थान करते.
याचा अर्थ असा की, हे व्यक्तिगत लाभाशी संबंधित नाही.
तर, हे आहे इतरांना प्राप्तीच्या आनंदात सामील करून घेणे.

‘यशस्’ म्हणजे महानतेच्या तेजाची प्राप्ती करणे.
याचा अर्थ असा की, हा प्रकाश सर्वांसाठी आहे,
कारण कोणतीही एक व्यक्ती प्रकाशाला ओलीस ठेऊ शकत नाही.

‘यशस्’च्या मर्मस्थानी कृतज्ञता आहे.
याचा अर्थ असा की, याचा आनंद तेव्हाच घेता येतो, जेव्हा
इतर लोक जसे आहेत,
ते जे आहेत
आणि ते जे करतात
त्यासाठी त्यांचीदेखील प्रशंसा केली जाते.

‘श्री’चा खरा अर्थ समजून घ्या
आणि हे अनुभवा की, तुम्ही त्याच्या कुशीत आहात जे कल्याणकारी आणि महान आहे.

‘यशस्’चा खरा अर्थ समजून घ्या
आणि स्वतःला त्यांच्यामध्ये असल्याचे अनुभवा
जे तुमच्यासमवेत
अंधकारावरील प्रकाशाचा विजयोत्सव साजरा करतात.

आपण या जगताच्या चक्रव्यूहात
मार्ग शोधणे जेव्हा शिकत आहोत,
ज्या जगतात उपजतात विचित्र परिस्थिती
आणि प्राप्तीच्या श्रेष्ठतम संभावना,

तेव्हा अशा समयी ‘श्री’ आणि ‘यशस्’ यांचे साक्षात् रूप,
आपले परमप्रिय भगवान नित्यानंद,
त्यांच्या अपरंपार कृपेत
आणि निरपेक्ष करुणेमध्ये
आपल्याला सुरक्षित आणि संरक्षित ठेवोत.

©२०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.